प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

जानेवारी 19, 2017

**बॉंबे मर्कंटाईल सहकारी बँक लि. मुंबई ह्यांना आरबीआयकडून दंड लागु**

बँकिंग विनियात्मक अधिनियम, 1949 (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या कलम 46 (4) सह वाचित, कलम 47ए(1) च्या तरतुदींखाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने बॉंबे मर्कंटाईल सहकारी बँक लि., मुंबई ह्यांना, रु.75.00 लाख (रुपये पंचाहत्तर लाख) दंड ठोठावला आहे, आणि हा दंड, तुमचा ग्राहक जाणा/अँटी मनी लॉंडरिंग (केवायसी/एएमएल) बाबत रिझर्व बँकेने दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने ह्याबाबत वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती. त्यावर वरील बँकेने लेखी उत्तर सादर केले होते आणि त्यावर तोंडी खुलासेही केले होते. ह्या प्रकरणातील सत्य गोष्टी व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेतल्यावर रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघनांना पुष्टि मिळत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/1940**